महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग —
राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय
उरो रुग्णालय परिसर औंध पुणे — २७

सत्यमेव जयते

उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यू
महाराष्ट्र राज्य पुणे

| | |
|---|---|
| संकेतस्थळ | : arogya.maharashtra.gov.in |
| कार्यालय | : ०२० —२६०५००२६ |
| नानोप विभाग | : ०२० —२६०५८७४७ |
| कायदा विभाग | : ०२० —२६०५००२७ |
| इमेल - | : crs_d83@yahoo.com crslegalcell@gmail.com |

**आरोग्य सेवा**
**परिपत्रक**

जा.क्र.आमाजीआ/कक्ष- ८३/कायदा विभाग/न.क्र.३५/दुरुस्ती संदर्भात मार्गदर्शन/ 4037-4108 /२६
दिनांक:- 30/03/2026

प्रति,
१) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु बृहन्मुंबई महानगरपालीका, मुंबई.
२) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यु (सर्व).
३) वैद्यकीय आरोग्य अधिकारी, तथा निबंधक जन्म-मृत्यु महानगरपालिका (सर्व).

विषय:- जन्म मृत्यू नोंदणीतील दुरुस्तीबाबत मार्गदर्शन.(कलम १५ व नियम ११)

महाराष्ट्र राज्यात केंद्र शासनाच्या जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ व महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम, २००० अन्वये जन्म व मृत्यू घटनांची नोंदणी करण्यात येत आहे. भारत सरकार, नवी दिल्ली यांची दि. ११.०८.२०२३ रोजीची अधिसूचना अन्वये जन्म-मृत्यु अधिनियम, १९६९ मध्ये सुधारणा करुन सुधारीत अधिनियम २०२३ दि. ०१ ऑक्टोबर २०२३ पासुन देशभर लागू करण्यात आला आहे.

जन्म आणि मृत्यु नोंदणी करण्यात आल्यानंतर नोंदणीमधील विविध माहिती बदल, दुरुस्ती अथवा संपुर्ण नोंदणी रदद करण्याबाबत नागरिक तसेच निबंधक यांच्याकडुन करण्यात येते. जन्म अथवा मृत्यु नोंदणीवहीतील दुरुस्ती अथवा रदद करण्याकरीता जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९, च्या कलम १५ मध्ये तसेच महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम २०००, नियम ११ मध्ये याबाबत स्पष्ट कायेदशीर तरतुद करण्यात आलेली आहे. सदर तरतुदींचा वापर करुन निबंधकाने याबाबत कार्यवाही करणे गरजेचे आहे.

जर निबंधकांना खात्री पटली की, नोंदवहीतील कोणतीही नोंद प्रारूप किंवा आशय याद्दष्टीने चुकीची आहे किंवा फसव्या / अयोग्यरीतीने केली गेली आहे, तर राज्यशासनाच्या नियमांनुसार निबंधक खालीलप्रमाणे कार्यवाही करू शकतात.

१. जन्म किंवा मृत्युच्या नोंदीवही मधील दुरुस्ती बाबत निबंधकांनी संबधिताकडुन याबाबतचे लिखीत स्वरुपातील अर्ज घेण्यात यावा.
२. निबंधकानी माहिती देण्या-या व्यक्तीने नोंदणी करीता देण्यात आलेली मुळ अभिलेखातील माहिती जन्म नोंदवही (नमुना क्र ७) अथवा मृत्यु नोंदवही (नमुना क्रमांक ८) तपासावी /तुलना करावी.
३. जर नोंदणीमध्ये सामान्य लेखनचुक (नावांच्या स्पेलिंग, अक्षरामधील काना मात्रा वेलांटी अशी लेखन प्रमादामध्ये अथवा औपचारिक) झाली असल्यास याबाबत कागदपत्रांची पडताळणी करुन खात्री करुन /समाधान झाल्यावरच त्याप्रमाणे निबंधकानी दुरुस्ती करावी.
४. सदर दुरुस्ती करताना जन्म नोंदवही (नमुना क्र ७ ) अथवा मृत्यु नोंदवही (नमुना क्रमांक ८) मुळ नोंदणीत कोणताही बदल न करता समासात / शेरा रकान्यात दुरुती नोंदवुन दिनांक लिहुन निबधकानी स्वाक्षरी करावी .
५. निबंधकानी नोंदवहीत दुरुस्ती ज्या कागपदत्रांची पडताळणी करुन केलेली आहे अशी सर्व कागदपत्रे ही नोंदवहीचा भाग असतील ती नोंदवहीसोबत कायम स्वरुपी जतन करण्यात यावीत. तसेच दुरुस्तीसंदर्भात माहिती देणाऱ्याची स्वाक्षरी घेण्यात यावी.



Scanned with OKEN Scanner

६. जर एखादी नोंद सारत: चुकीची आहे, असे जर एखादी व्यक्ती खात्रीने सांगत असेल तर निबंधकांनी, त्या चुकीचे स्वरुप आणि प्रकरणातील खरी माहिती असलेल्या दोन विश्वसनीय व्यक्तींनी दिलेली प्रकरणाची सत्यस्थिती बाबतचे प्रतिज्ञापत्र सादर केल्यावर खात्री करुन कलम १५ नुसार नोंदीची दुरुस्ती करेल.

७. मुलाच्या जन्माच्या नोंदणी नंतर आई वडिलांनी त्याच्या नावात बदल केला आणि तो गॅझेटमध्ये प्रसिध्द झाला तर त्यानुसार त्याचा नावाचा समावेश नोंदवहीत करण्याबाबतची बाब कलम १५ मध्ये अंतर्भत करण्यात आलेली नाही त्यामुळे नावातील बदलाचा जन्म नोंदवहीत समावेश करण्याची गरज नाही.

८. जन्म अथवा मृत्यु प्रमाणपत्रावर असलेल्या राहत्या घराचा पत्ता व कायमचा पत्ता हे घडलेल्या घटनेच्यावेळी असणाऱ्या स्थितीशी निगडीत आहेत. पुढील काळात सदर पत्यात बदल झाल्या सत्याप्रमाणे प्रमाणपत्रात बदल करण्याची तरतूद अधिनियम व नियमात नाही.

९. निबंधकांनी कलम १५ व नियम ११ नुसार करण्यात आलेल्या नोंदणीमधील दुरुस्तीची माहिती आवश्यक तपशीलासह नियमित उपमुख्य निंबधक , जन्म व मृत्यु, महाराष्ट्र राज्य यांना कळवावी.

१०. नोंद कपटाने किंवा अयोग्यरीतीने केली असल्यास नोंद रद्द करणेबाबत खालील कार्यवाही करावी :

- निबंधकाने खात्री करावी, अर्जदार/ तक्रारदार यांचे लेखी म्हणणे घ्यावे.
- रद्द करण्याची खात्री झाल्यास सर्व कागदपत्रांसह व स्वयंस्पष्ट अभिप्रायासहित प्रस्ताव जिल्हा निबंधक कार्यालयास पाठवावा.

११. कपटाने, चुकीच्या / अयोग्यरीत्या केलेल्या नोंदी रद्द करण्यासंबंधित प्रस्ताव सर्व कागदपत्रांसोबत जिल्हा निबंधक कार्यालयाने तपासून, आवश्यकतेनुसार सविस्तर चौकशी करून स्वयंस्पष्ट अभिप्रायासह राज्य स्तरावर पाठवावा . सदर नोंदीबाबत जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९, च्या कलम ११ मध्ये तसेच महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम २०००, नियम ६ नुसार कार्यवाही करण्यात येते. मा.संचालक (प्राथमिक ), आरोग्यसेवा , पुणे तथा मा. मुख्य निबंधक, जन्म-मृत्यू, महाराष्ट्र राज्य यांचे आदेशाने सदर नोंदी CRS पोर्टल वरुन रद्द करता येते.

१२. निबंधकानी जन्म अथवा मृत्यू ची कोणतीही नोंद मुख्य निबंधकांच्या मान्यतेशिवाय रद्द करू नये.

आपल्या कार्यक्षेत्रातील निबधक यांना कलम १५ नियम ११ मधील तरतुदीबाबत अवगत करण्यात यावे.

(डॉ. बी. एस. कमलापूरकर)
उपसंचालक आरोग्य सेवा, (आमाजीआ) पुणे
तथा उपमुख्य निबंधक,जन्म व मृत्यू
महाराष्ट्र राज्य

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी सस्नेह सादर :-
उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळे ............ (सर्व) आपल्या कार्यक्षेत्रातील संबंधितांना याबाबत कळविण्यात यावे.

प्रत माहितीस्तव सबिनय सादर:- १) मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुबई.
३) मा. संचालक (रुग्णालय), आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई.
४) मा. संचालक, (प्राथमिक), आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक, जन्म मृत्यू , पुणे.
५) मा.संचालक, जनगणना कार्यालय, एक्सचेंज इमारत, दुसरा मजला, शिवसागर रामगुलाममार्ग बेलोर्ट इस्टेट, मुंबई.

Kam_let2020 all- itar_circular

Scanned with OKEN Scanner